# छत्रपती शाहू महाराजांनी (इ.स. १८७४-१९२२) कोल्हापूर संस्थानातील अस्पृश्य समाजासाठी केलेले शैक्षणिक कार्य

**डॉ. विद्यासागर पु. सोनकांबळे**
इतिहास विभाग
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन

सामाजिक क्रांतीचे जनक म. फुले यांनी १९ आक्टोबर १९८२ साली हंटर कमीशनपुढे निवेदन सादर केले यात शिक्षणाचा उध् देश स्पष्ट केला होता ब्राम्हणवादी समाजव्यवस्थेने शुद्रातीशुद्रांना शिक्षणाचा अधिकार नाकारल्यामुळे तो समाज माणुसकीच्या हक्कापासुन हजारो मैल दुर राहीला आहे तेव्हा शिक्षण हाच याप्रकाराच्या गुलामगिरीवर प्रभावी उपाय आहे हे म.फुले यांनी जाणीले होते म. फुले यांचा वारसा चालविणाऱ्या शाहू महाराजानी अस्पृश्य समाज शिक्षित झाल्याशिवाय त्यांना मानाचे स्थान मिळणार नाही अस्पृश्य उध्दार हा जिव्हाळयाचा प्रश्न महाराजांसमोर उपस्थित झाला होता.

शिक्षणावरील उच्चवर्णियाची मक्तेदारी मोड्न काढण्यासाठी शिक्षणाचा प्रभाव शुद्र अस्पृश्य मानलेल्या जाती पर्यंत पोहचविण्याचे महान कार्य शाहू महाराजांनी केले व शिक्षणाद्वारे जातीभेद मोडण्याचा प्रयत्न केला प्राचीन काळापासुन विद्या आणि श्रम याची ताटातुट झालेली होती, भौतिक प्रगती खुंटलेली होती, ब्राम्हणवाद्यानी न्याय, व्याकरण, काव्य, नाटक, या विषयावर ग्रंथ निर्मीती केली पण आधुनिक विचाराच्या ज्ञानापासुन ते फार दुर होते. भारतातील इंग्रजांचा प्रवेश व इंग्रजी भाषा यामधुन भौतिक जिवनाची माहिती मिळु लागली. शास्त्रीय शोधाच्या सहाय्याने इंग्रजांनी निसर्गावर

मिळविलेले विजय पाहुन मानवी बुध्दीच्या सामर्थ्याची कल्पणा येवु लागली या सर्व घटनेकडे शाहू महाराजांनी गार्भियाने पाहीले महाराजानी उदारमनाने पशु सारखे जिवन जगणाऱ्या लोकांना शिक्षण देवुन त्यांना चेतविले, सर्व मानव समान आहेत असा महाराजानी विचार मांडला शिक्षणातुनच अस्पृश्यांचा उध्दार होणार असे त्यांना वाटत असे अस्पृश्य वर्गात शैक्षणिक चळवळ सुरू करण्याचा ध्यासच शाहू महाराजानी घेतला होता.

१६ जुलै १९०२ रोजी शाहू महाराजांनी अस्पृश्य वर्गाच्या शैक्षणिकउन्नतीसाठी अभुतपुर्व असा जाहीरनामा प्रसिध्द केला होता तो पुढील प्रमाणे "सध्या कोल्हापूर संस्थानामध्ये सर्व वर्णाच्या प्रजेस शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकांच्या स्थितीत सदरहू प्रयत्नास जितके यावे तितके यश आले नाही हे पाहुन सरकारला फार दिलगीरी वाटते हया विषयी काळजीपुर्वक विचाराअंती सरकारनी असे ठरविले आहे की, यशाच्या या अभावाचे खरे कारण उच्चप्रतीच्या शिक्षणास मोबदले पुरे दिले जात नाही या गोष्टीस काही अंशी तोड काढण्याकरीता व उच्चप्रतीच्या शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजाजनापैकी मागासलेल्या वर्गानी अभ्यास करावे म्हणुन उत्तेजन दाखल आपल्या संस्थानाच्या नोकरीचा आजपर्यंत चालु असल्यापेक्षा बराच मोठा भाग या लोकांकरीता निराळा राखुन ठेवणे इष्ट होईल असे सरकारने ठरविले आहे"१ शाहू महाराजाचे अस्पृश्य समाजाकडे विशेष लक्ष होते हे त्यांनी काढलेल्या वरील जाहीरनाम्यातुन दिसुन येते, "सन १९०० ते १९१९ अखेर मागासवर्गीयासाठी कोल्हापूर संस्थानामध्ये पुढील प्रमाणे शाळा होत्या

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

| वर्ष | शाळा |
|---|---|
| १९००-०१ | ०६ |
| १९१२-१३ | २७ |
| १९१७-१८ | २२ |
| १९१८-१९ | १९ |

यामध्ये विद्यार्थी संख्या अनुक्रमे १९६,३३६,४०१,४७८ अशी होती"२ शाहू महाराजांनी शिक्षण्विषयी सर्वांगीन दृष्टीकोन अंगीकारलेला होता फक्त शिक्षण देवुन सोयीसवलती उवलब्ध करून देणे एवढाच त्यांचा उद्देश, मर्यादीत दृष्टीकोन नव्हता तर जनसामान्याच्या मनात शिक्षणासंबंधीची अभुतपुर्व लालसा रूजविण्याचा त्यांचा प्रयत्न होता. २७ डिसेंबर १९१७रोजी खामगांव येथे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या ११व्या अधिवेशनात अध्यक्षीय भाषणात शाहू महाराज म्हणतात 'शिक्षणानेच आमचा तरूणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडुन गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्यी व लढवय्य विर कधीही निपजणार नाहीत, म्हणुन सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाळ म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनु आणि त्यांच्या मागुन झालेल्या शास्त्रकारानी त्या त्या वेळेच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळया जातीच्या व्यवहारात बंधनकारक असे निंबंध रचिले आणि कमी जातीच्या लोकांना विद्या मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले, त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ आणि वेद हे सुध्दा वाचण्याची त्यांना मनाई होती."३

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

"शाहू छत्रपतीनी आपल्या संस्थानामध्ये ८ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या मोफत शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिध्द केला त्यानुसार महाराजाच्या हस्ते ३० सप्टेंबर १९१९ रोजी सक्ती शिक्षण मोहिमेस सुरूवात झाली" ४ बालवयात योग्य संस्कार केले तरच त्यांचा आयु यकाळ उज्वल राहिल म्हणुन बालवयातच शिक्षण मिळाले पाहिजे अशीच त्यांची विचारसरणी होती. अशा सक्तीच्या शिक्षणातुन इतराबरोबर अस्पृश्यांना समाजाच्या समानतेच्या पातळीवर छ. शाहू महाराजांना आणावयाचे होते. त्यांना स्वकर्तत्वाची व कर्तव्याची जाणीव निर्माण करून द्यावयाची होती. कर्तव्य संपन्न मनुष्य उच्च पदावर जाउ शकतो परंतु या कर्तत्वास वाव मिळाला नाही तर ते कर्तत्व कुजुन जाण्याची शक्यता असते. शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजाला कर्तत्व अजमावण्याची संधी प्राप्त करून दिली मोफत सक्तीचा शिक्षण कायदा केला तरीही अस्पृश्यांना इतर समाजापेक्षा वेगळी वागणूक दिली जात आहे असे महाराजांच्या लक्षात आले.

शाहू महाराजांनी याविषयी शाळा खात्याच्या संदर्भात वटहुकूम काढला तो असा "हुजुराच्या पाहण्यात असे आले की, अस्पृश्यांना व स्पृश्यांना शाळा खात्यात निन्हाळया तऱ्हेने वागविले जाते व अस्पृश्यांना शाळा खात्याच्या कंपाऊडच्या आत येऊ दिले जात नाही. सरकारी इमारती खाजगी उपयोगासाठी दिल्या नसत्यामुळे अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नसुन अस्पृश्यांची प्रत्येक तऱ्हेने काळजी घेतली पाहिजे शिक्षण संस्था गरीब लोकांकरीता असुन गरीबातील गरीब जे अस्पृश्य त्यांना समतेच्या पायावर वागविने योग्य आहे. ते कर देतात तर मग त्यांना वाईट रीतीने का वागवावे! हुजूरांची अतःकरणपुर्वक इच्छा आहे की, शाळा खात्यातील ज्या खाजगी किंवा सरकारी संस्थाना ग्रॅन्ड, इमारती किंवा प्लेग्राऊंड इत्यादी रूपाने मदत मिळते, त्यांनी स्पृश्य

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

वर्गापेक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे. कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढु शकतात परंतु अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही, जर अस्पृश्यांना ममतेने वागविले नाही मग तो प्रिन्सीपल अगर खालच्या दर्जाचा शिक्षक असो त्याला जाब द्यावा लागेल आणि खाजगी संस्थाना जी मदत मिळते ती काढुन घेण्यात येईल." ५

अस्पृश्यांना स्वतंत्र शाळा होत्या. त्या शाळा १९१९ पासुन बंद केल्या आणि जाहिरनामा काढला. "येत्या दसऱ्यापासुन करवीर राज्यातील जहागीरी सोडुन अस्पृश्यासाठी असलेल्या वेगळ्या शाळा कायमच्या बंद करण्यांत येत आहेत. सरकारी शाळामध्ये ज्या प्रमाणे इतर जातीची मुले दाखल करून घेण्यात येतात त्याच प्रमाणे अस्पृश्य मुलेही दाखल करून घ्यावयाची आहेत. सरकारी शाळेमध्ये शिवाशिवीची प्रथा पाळावयाची नाही सर्व जातीची व धर्माची मुले एकत्र बसवावयाची आहेत. (हुजूर ठराव क्रमांक ३४० ता.३०. ०९.१९१९)"६ महाराजाच्या या आज्ञेमुळे अस्पृश्यतेच्या कलंकामुळे इतरापासुन सतत दुर राहिलेला समाज एकेठिकाणी येणार होता.

स्पृश्य विद्यार्थ्यामध्ये अस्पृश्यांविषयी जी घृणा होती ती नाहीशी करण्यांचा महाराजाचा उद्देश होता. "शाहू महाराज यांना अस्पृश्याविषयी फार कळवळा होता अस्पृश्यांनी शिक्षण घ्यावे असे त्यांना स्वतःलाच वाटे"७ शाहू महाराजांनी गरीब होतकरू मुलांच्या शिक्षणाची सोय करीत असतांना शिक्षणातुन गुणवत्ता धारण करणा-या होतकरू मुलांवर त्यांचे विशेष लक्ष असे. पैसे परत करण्याचे अगर ठराविक काळापर्यंत दरबाराची नौकरी करण्याचे बंधनही त्यांनी कधी विद्यार्थ्यावर घातले नाही. जात-पात, धर्म-पंथ अशा संकुचीत विचारात ते कधी गुरफटले नाही. हे करीत असतांना महाराजांनी राजसत्तेचा आवश्यकतो वापर केलेला होता.

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

मागासवर्गीय मुलांच्या शैक्षणिक प्रश्नाचा विचार करीत असता खेडयातील मुलांच्या राहण्याची व्यवस्था असावी असे महाराजांना वाटले व त्यानी "खेडयापाड्यातील विद्यार्थ्याच्या शिक्षणाच्या सोयीसाठी कोल्हापूरात वसतीगृहे बांधण्यास सुरूवात केली" ८ शाहू महाराजांनी सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यासाठी वसतीगृहे स्थापन करून अभिनव अशी मोहिम सुरू केली होती. परंतु इतर जातीच्या मुलांना त्यांचे आई वडील अस्पृश्य विद्यार्थ्यासोबत आपले मुले ठेवण्यास तयार नसल्यांचे महाराजांच्या लक्षात आले, महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्याची वेगळी वसतीगृहे स्थापन केली त्यामध्ये महाराजांनी स्वतःच्या "खाजगी खर्चातुन राजपूत वाडी कॅम्प सोनतळी, स्टेशन बंगला व रूकडी कॅम्प येथे अस्पृश्य विद्यार्थ्यासाठी वसतीगृहे चालवली त्यांच प्रमाणे मिस क्लार्क वसतीगृह (१९०८) आर्य समाज गुरूकुल वुड हाऊस वसतीगृह (१९१८), ढोर चांभार तथा इंदुमती राणीसाहेब वसतीगृह (१९१९), अस्पृश्य वसतीगृह पंढरपुर (१९२०) ही चार वसतीगृहे दरबाराच्या मदतीने चालविली. एकुण सात वसतीगृहे शाहू महाराजांनी अस्पृश्यासाठी चालवली"९

**सारांश**

अज्ञान, अंधकार, जन्मापासुन दारिद्रयाची बसलेली चटके, भेदभाव, शिवाशिवी अशी दयनीय अवस्था अस्पृश्य समाजाच्या वाटयाला आलेली होती यावर प्रभावी औषध शिक्षण हेच असल्याचे महाराजांना वाटले. म्हणुन त्यांनी अस्पृश्य मुला-मुलीना शिक्षण देऊन त्यांना समताधिष्ट समाजव्यवस्थेच्या पंगतीत आणुन बसवीले आणि उच्चवर्णीयाची शिक्षणात असलेली मक्तेदारी संपुष्टात आणुन समतेच्या तत्वाचे बिजारोपण केले. पुर्वाश्रमीचा अस्पृश्य समाज स्वतःच विचारमुख झालेला आहे. हक्क,

कर्तव्य, अधिकार याविषयी विचार करीत आहे. याचे श्रेय शाहू महाराजांना द्यावेच लागेल.

**संदर्भ ग्रंथ**


१) डॉ जयसिंगराव पवार- राजर्षी शाहू छत्रपती: एक मागोवा ( प. आ. २००४) सुमारे प्रकाशन डोंबिवली पुर्व पृ. १५

१) राजर्षी शाहू गौरवग्रंथ ( दु. आ. मार्च १९८८) शिक्षण व सेवा योजना विभाग महाराष्ट्र राज्य मुबंई पृ. ९१

३) प्रदिप गायकवाड ( संपा.) राजर्षी शाहू महाराजाची निवडक भाषणे आणि आज्ञापत्रे (दु. आ. २००३) क्षितिज पब्लिकेशन्स नागपूर पृ. ४२

४) प्रा. अशोक राणा - लोकांचा राजा शाहू छत्रपती ( दु. आ. २००६) जिजाई प्रकाशन पुणे पृ. १५

५) राजर्षी शाहू गौरवग्रंथ ( दु. आ. १९८८) कित्ता पृ. १५३

६) प्रा. चगोंले पी. एस. रविदास सत्यशोधक मासिक ( जुलै २००८) दत्त मुद्रण नागपूर पृ. ८४

७) लोकराज्य- धम्म चक्र परिवर्तन दिन सुवर्ण महोत्सव विषेशांक ( आक्टोबर २००६) महाराष्ट्र शासन पृ. १२८

८) कीर धनंजय- राजर्षी शाहू छत्रपती ( ति. आ. २००८) पॉप्युलर प्रकाशन मुंबई पृ.१०५

९) प्रा. चांगले पी. एस. ( सपा. रविदास सत्यशोधक मासिक ( जुलै २००८) कित्ता पृ.४